राज्यातील नाट्यगृहांचे अत्याधुनिकीकरण करणार

मंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे निर्देश

लोकमत न्यूज नेटवर्क

मुंबई : राज्यातील नाट्यगृहांचे आधुनिकीकरण आणि अद्ययावतीकरण करण्यासाठी योजना तयार करण्याचे निर्देश सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी बुधवारी एका बैठकीत दिले.

राज्यातील नाट्यगृहांच्या समस्यांबाबत बैठक मंत्रालयात मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. यावेळी नाट्य निर्माता दिलीप जाधव, सांस्कृतिक कार्य विभागाचे उपसचिव विलास धोरात, विद्या लाखकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव प्रशांत नवघरे उपस्थित होते.

प्रत्येक नाट्यगृहाच्या अत्याधुनिकीकरणासाठी चार ते दहा कोटी रुपयांची आवश्यकता आहे. त्याच्या निधी वाटपाचे टप्पे निश्चित करण्यात येतील. राज्यात सध्या एकूण ८३ नाट्यगृहे आहेत. यापैकी खाजगी २८, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अखत्यारित ५१ आणि राज्य शासनाची ४ नाट्यगृहे आहेत. या सर्व नाट्यगृहांचे अत्याधुनिकीकरण पुढील ५० वर्षांत करण्यात येईल.

जग थक्क होईल असे वस्तुसंग्रहालय उभारणार

राज्याचे संपूर्ण सांस्कृतिक वैभव प्रदर्शित होण्याबरोबरच अवघे जग थक्क होईल, असे राज्य वस्तुसंग्रहालय महाराष्ट्रात साकारण्यात येईल, असे सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले. हे संग्रहालय कुठे उभारण्यात यावी याची घोषणा मात्र यांनी केली नाही.

या संग्रहालयात महाराष्ट्राचा इतिहासाचे महत्त्वाचे कालखंड जसे की, अश्मयुगीन, प्रागैतिहासिक काळ, ऐतिहासिक व मध्ययुगीन काळ, मराठा व ब्रिटिश कालखंड तसेच महाराष्ट्रातील लोकजीवन व आदिवासी संस्कृती, स्वातंत्र्य लढा व संयुक्त महाराष्ट्र चळवळ हे समाविष्ट असेल, वासाही सल्लागार समिती स्थापन करण्यात आली आहे, असेही मुनगंटीवार यांनी सांगितले.

पीएफआयच्या आधी आरएसएसवर बंदी घाला

लालूप्रसाद यांची मागणी : भाजपनेही दिले उत्तर

पाटणा / नवी दिल्ली : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची उल्लेख हिंदू अतिरेकी संघटना असा करत राजदचे प्रमुख लालूप्रसाद यादव यांनी म्हटले आहे की, पीएफआयच्या आधी आरएसएसवर बंदी घालायला हवी. यादव भाजपने प्रस्तुत देत लालूप्रसाद हे व्होट बँकेचे आणि ढोंगी धर्मनिरपेक्षतेचे राजकारण करत असल्याचे म्हटले आहे.

धर्मनिरपेक्ष स्वरुप धोक्यात आहे, असे म्हणणे देशाची संप्रदायिक आणि धर्मनिरपेक्ष रचना धोक्यात आणण्याचा प्रयत्न करत आहेत. आपली कट्टरपंथी विचारधारा पुढे करून राजकीय इस्लाम स्थापित करण्याचा प्रयत्न करत असल्याचे सुरुवातीनेसाही गैभीर धोका निर्माण करत आहेत. तसेच, हिंदू कार्यकर्त्यांना लक्ष्य करत आहेत.

या अधिकाऱ्यांनी असाही दावा केला आहे की, पीएफआय गुप्तपणे प्रशिक्षण सराव, लष्करी कवायतीचे आयोजन करते. इस्लामच्या शत्रू म्हणून ओळखल्या जाणाऱ्या धार्मिक गटांविरुद्ध हल्ले करण्यासाठी आणि हिंसाचार वापरण्याचे प्रशिक्षण दिले जाते. पीएआयवर असाही आरोप आहे की, ते सतत सरकारविरोधी प्रचारात गुंतले आहेत. भारतात मुस्लिमांवर अत्याचार होत असल्याचा ते प्रसार करत आहेत.

त्यांनी डिसेंबर २०१९ मध्ये आणि मार्च २०२० मध्ये सीएएविरुद्ध निदर्शने आयोजित करण्यात कथित पुढाकार घेतला होता. त्यांच्याविरुद्ध अनेक प्रकरणे नोंदवियात आली होती. यातील ५१ प्रकरणे उत्तर प्रदेशातील होती.

देशातील १७ राज्यांत ही संघटना आहे. २६ जुलै रोजी बेल्लारे शहरात भारतीय जनता युवा मोर्चाचे सदस्य प्रवीण नेतरू यांची हत्या म्हणजे पीएफआयचे हिंसक चरित्र उघडकीस आणणारी घटना होती. यावरून राजकारण तापणार आहे.

वीज पडून राज्यात सात जणांचा मृत्यू

लोकमत न्यूज नेटवर्क

चंद्रपूर/यवतमाळ/लातूर/पुणे : विदर्भ, मराठवाड्यासह राज्यात काही ठिकाणी बुधवारी विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस झाला. यावेळी ठिकठिकाणी वीज पडून सात जणांचा मृत्यू झाला, तर चार जण जखमी झाले.

चंद्रपूर जिल्ह्यात वीज पडून तीन जण ठार झाले. जिवती तालुक्यातील चिखली परिसरात दोन महिलांचा जागीच मृत्यू झाला. बुधवारी सायंकाळी शेतीची कामे आटोपून त्या घरी परतत होत्या. तसेच, जिवती तालुक्यातीलच मराई पाटण येथील एका इसमाचाही वीज पडून मृत्यू झाला.

यवतमाळ जिल्ह्यात वीज कोसळून बुधवारी दोघांचा मृत्यू झाला. वडनेर येथे वीज कोसळून गौता माणिक राठोड (४०) या महिलेचा मृत्यू झाला. तर झरीजामणी तालुक्यातील कारेगाव शिवारात लहू रामू धुर्वे (४०) या शेतकऱ्याचा अंगावर वीज कोसळून ते जागीच ठार झाले.

लातूर जिल्ह्यात लांबोटा (ता. निलंगा) येथे उषाबाई लक्ष्मण आवटे (४४) या महिलेचा वीज पडून मृत्यू झाला. पुणे जिल्ह्यातील सादलगाव (ता. शिरूर) येथे बुधवारी दुपारी वीज पडून १८ वर्षीय तरुणीचा मृत्यू झाला. रिता नाईक असे तरुणीचे नाव आहे.

आर. व्यंकटरामानी नवे ॲटॉर्नी जनरल

नवी दिल्ली : ज्येष्ठ विधिज्ञ आर. व्यंकटरामानी यांची देशाचे नवे ॲटॉर्नी जनरल म्हणून तीन वर्षांसाठी बुधवारी नियुक्ती करण्यात आली. ते के. के. वेणुगोपाल यांची जागा घेतील. वेणुगोपाल यांचा कालावधी ३० सप्टेंबर रोजी समाप्त होणार आहे. वेणुगोपाल (९५) यांची जुलै २०१७मध्ये या पदावर नियुक्ती करण्यात आली होती. २९ जून रोजी त्यांची देशाचे सर्वोच्च कायदा अधिकारी म्हणून तीन महिन्यांसाठी नियुक्ती करण्यात आली होती.



अयोध्येत लता मंगेशकर स्मृती चौकाचे लोकार्पण

राजेंद्रकुमार

लोकमत न्यूज नेटवर्क

लखनौ : राम नामाच्या धूनने भाविकांचे भावविश्व पावन करणाऱ्या गानकोकिळा लता मंगेशकर यांच्या स्मृती आता नेहमीसाठी रामनगरी अयोध्येशी जोडल्या गेल्या आहेत. अयोध्येत राम जन्मभूमीकडे जाणाऱ्या मुख्य मार्गावरील नया घाट चौक आता लता मंगेशकर चौक म्हणून ओळखला जाणार आहे.

लता मंगेशकर यांच्या जयंतीनिमित्त बुधवारी मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ व केंद्रीय संस्कृती व पर्यटनमंत्री जी. किशन रेड्डी यांनी या स्मृती चौकाचे लोकार्पण केले. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्हिडिओ संदेशाच्या माध्यमातून हा चौक करून जनतासाठी प्रेरणास्थळ होईल, असे सांगितले.

यावेळी मुख्यमंत्री म्हणाले की, लता मंगेशकर यांनी श्रीराम व श्रीकृष्णाची भजने गायली. त्याचवरोबर राष्ट्रभक्तीची गीते गाऊन संगीत साधनेला वंदनीय बनवले. पुढील एक वर्षात अयोध्येतील सर्व चौकांचे सौंदर्यीकरण केले जाणार असून, त्यांचे नामकरण महर्षी वाल्मिकि, रामानुजाचार्य, गोस्वामी तुलसीदास असे केले जाणार आहे. एवढेच नव्हे तर श्रीराम जन्मभूमी अंतरराष्ट्रीय संग्रहालय असलेल्या महापुरुषांची नावेही चौकांना दिली जाणार आहेत.

Maharashtra Legislature Secretariat

2018/MLS/J(Library)/2022-23

Maharashtra Legislature Secretariat invites Tenders / Techno commercial proposals in two bid system from reputed companies for design, development, implementation and operations of Digitalization of documents, Library portal with A1/M1 based multilingual search engine. B1 analytics and upgradation of IT infrastructure of Maharashtra Legislature Secretariat. The tender can be downloaded from E-Tendering website **www.mahatenders.gov.in** by paying the tender fees online.

sd/-
Date :- 29th September 2022 **Rajendra Bhagwat**
Place :- Mumbai **Principal Secretary**
Maharashtra Legislature Secretariat

महाराष्ट्र शासन सुरेखांकन

पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, पुणे
(म्हाडाचा विभागीय घटक) म्हाडा MHADA

गृहनिर्माण भवन, आगरकर नगर, पुणे ४११००१ फोन : ०२०-२६१२२८८९/२६१२३३०१/२६१२८८६८/२६१२८०८२

निविदा सूचना

दिस जसलेल्या जदनिकांची विक्री करण्याकरीता मार्केटिंग एजन्सीची नेमणूक करणेबाबत...

पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, पुणे यांचे तसेच शासकीय, निमशासकीय, खाजगी, सहकारी, गृहनिर्माण संस्था यांचेसह इतरांना विविध गृहनिर्माण प्रकल्प राबविण्यात आले आहे. त्याअंतर्गत, पुणे जिल्हा गृहनिर्माणची विक्री होणेकामीत अनिवासी इतिहासिक कारण अनिवासीय घरांसाठी ग्राहकांची मागणी असल्याने त्याचा सन्मान आणि अधूर असलेले व्यक्तिसमोरची गृहनिर्माण देऊन देशाचे नागरी विकास करण्यासाठी मंडळाने विविध गृहनिर्माण प्रकल्पांमधील मार्केटिंग एजन्सीची नेमणूक करण्याचा मानस आहे. त्यासाठी मंडळाने अनुभवी गृहनिर्माण संस्थांकडून मार्केटिंग एजन्सीची नेमणूक करण्यासाठी निविदा मागविण्यात येत आहे. तरी इच्छुकांनी मार्केटिंग एजन्सीची नेमणूक करण्यासाठी निविदा सादर करण्यासाठी दि. २९.०९.२०२२ ते दि.०६.१०.२०२२ या कालावधीत ऑनलाईन पध्दतीने निविदा सादर कराव्यात.

निविदा सूचना संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

निविदा सूचना संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली आहे. तसेच निविदेची विक्री व या संबंधी सर्व माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

जा.क्र. निविदेची विक्री व या संबंधी सर्व माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच निविदेची विक्री व या संबंधी सर्व माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

निविदा सूचना संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली